**पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे**

मामासाहेब मोहोळ महाविद्यालय,

पौड रोड,पुणे-३८

**मराठी विभाग वार्षिक अहवाल २०१९-२०२०**

**१.पोस्टर प्रदर्शन स्पर्धा**

पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पोस्टर प्रदर्शन स्पर्धा दि.१२/१२/२०१९ रोजी महाविद्यालात आयोजित करण्यात आली.मराठी विभागातील १० विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला.शाश्वत कृषी पद्धती,स्वच्छता आणि आरोग्य,संसाधन व्यवस्थापन,औद्योगिक विकास,भविष्कालीनपरिवहन आणि संचार,शैक्षणिक खेळ आणि गणितीय प्रतिकृती इत्यादी विषयाच्या अनुषंगाने स्पर्धा घेण्यात आल्या.या स्पर्धेत मराठी विभागातील पुढील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**१.अजिंक्य काटे**
**२.सागर गायकवाड**
**३.रोहिणी शेंडे**
**४.नेहा म्हात्रे**
**५.अनिल सोनावणे**
**६.रेश्मा निंबाळकर**
**७.शुभांगी मोहोळ**
**८.मैलारी खरची**
**९.फाले प्रतिमा**
**१०.रोहिणी पवार**

यापैकी सागर गायकवाड एम.ए द्वितीय वर्ष या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावला.रोहिणी शेंडे व अजिंक्य काते या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकवला. या पोस्टर प्रदर्शनासाठी मराठी विभाग प्रमुख डॉ.विजय बालघरे,प्रा.सुशील धसकटे ,प्रा.किरण गाढवे यांनी मार्गदर्शन केले.

## २. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अहवाल (०१ जाने २०२० ते १५ जाने २०२०)

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या मामासाहेब मोहोळ महाविद्यालयात **दिनांक ०१ जानेवारी २०२० ते १५ जानेवारी २०२०** या कालावधीमध्ये **मराठी भाषा संवर्धन पंधरवडा** विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. त्या अंतर्गत **दि.०३ जाने २०२०** रोजी महाविद्यालयात **काव्यवाचन व कथा अभिवाचन** करण्यात आले.या कार्यक्रमाच्या सुरुवातीस पहिल्या महिला शिक्षिका व समाज सुधारक **सावित्रीबाई फुले यांना त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी त्यांना आवडलेल्या कवितांचे वाचन केले तसेच त्यांच्यासाठी अभिजात कथांचे अभिवाचन करण्यात आले. विद्यार्थी काव्य आणि कथांमध्ये रममाण झाले.

**दि.०७ जाने २०२०** रोजी **शुद्धलेखन आणि हस्ताक्षर स्पर्धा** घेण्यात आल्या. आजच्या या धावपळीच्या युगात आपण आपल्या भाषालेखनाबाबतीतही फारसे जागरूक नाही, त्यामुळे अनेक शब्द आपण चुकीच्या पद्धतीने उच्चारतो तसेच त्यांचे लेखनही चुकीच्या पद्धतीने करतो म्हणूनच मराठी विभागामार्फत शुद्धलेखन स्पर्धा देखील घेण्यात आली तसेच आज आपण आपल्या अक्षराकडे फारसे लक्ष देत नाही म्हणून हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये सुमारे १०३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.हस्ताक्षर स्पर्धेत गावूडसे निकिता विठ्ठल हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला.आशिष अनिल शेळके व कृतीक विलास खळे यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला.शुद्धलेखन स्पर्धेत तोंडे प्रतीक्षा चंद्रकांत या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक प्राप्त केला.तर रेश्मा दशरथ निंबाळकर व खराद वैभव विठ्ठल यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला

**दि.०८ जाने २०२०** रोजी **हरवत चाललेले शब्द व म्हणी** यांचे सर्वेक्षण करण्यात आले.मराठी भाषेमध्ये कालानुरूप अनेक शब्द हरवत चाललेले आहेत त्याऐवजी नवीन शब्द येत आहेत तसेच अनेक म्हणीही आज हरवत चाललेल्या आहेत. नवीन म्हणी रुढ होत आहेत म्हणून हरवत चाललेले शब्द व म्हणी यावरही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सर्वेक्षण करून अनेक शब्द व म्हणींचे जतन मराठी विभागाच्या वतीने करण्यात आले.

याच कार्यक्रमाचा भाग म्हणून महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने **दि.१३ जाने २०२०** रोजी **कवी संतोष गाढवे यांनी 'कवितेचा गाव'** हा कार्यक्रम सादर केला. त्यांच्या 'माय मराठी', 'ऊसतोड कामगाराची कविता' या कवितांना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त दाद दिली.

**दि. १४ जाने २०२०** रोजी **डॉ.राजेंद्र थोरात यांनी 'लघुपट आस्वाद'** या विषयावर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला.यामध्ये चित्रपट व लघुपट क्षेत्रांमधील व्यावसायिक संधी त्यांनी सहजसोप्या उदाहरणांनी विद्यार्थ्यांना पटवून दिल्या तसेच लघुपट, चित्रपट कसा पहावा याबद्दलही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याचाच एक भाग म्हणून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त लघुपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. यामध्ये सुप्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते नागराज मंजुळे यांचा **'पिस्तुल्या' हा लघुपट तसेच 'गल्ला'** हा लघुपट महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. त्यांनीही याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन प्राचार्य डॉ. बाळकृष्ण झावरे यांच्या मार्गदर्शनाखाली **मराठी विभागप्रमुख डॉ. विजय बालघरे,प्रा. सुशील धसकटे, प्रा. किरण गाढवे** यांनी केले. या कार्यक्रमासाठी डॉ.शिवाजी शिंदे, प्रा. हरिदास खेसे,डॉ.योगेश पवार ,प्रा. लक्ष्मण उकिरडे, प्रा.अशोक शेळके, डॉ. रूपाली शेंडकर,डॉ.प्रकाश हुंबाड,प्रा,तानाजी जाधव.शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.